**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**माननीय सदस्यांचे वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन**

**सभापती :** आज माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे तसेच माननीय सदस्य सर्वश्री भाई गिरकर व अब्दुल्ला खान दुर्राणी यांचा वाढदिवस आहे. सभागृहाच्या वतीने मी माननीय सदस्यांचे वाढदिवसाबद्दल अभिष्टचिंतन करतो व त्यांना दिर्घायुष्य लाभो अशा शुभेच्छा देतो.

----

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

**सभापती** : माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी थोडक्यात आपले म्हणणे मांडावे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, गेले तीन दिवस राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने कर्जमाफी जाहीर करावी असा आग्रह आम्ही सभागृहात करीत आहोत. विशेषकरुन विदर्भात गेल्या काही महिन्यात ज्या ज्या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या, अशा पैकी काही ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट दिली. इतकेच नव्हे तर माननीय मुख्यमंत्र्यांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या घरी मुक्कामही केला. माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी सांगण्याचा प्रयत्न केला परंतु ते खोडून काढण्यात आले. ही वस्तुस्थिती आहे की, ज्या घरी माननीय मुख्यमंत्र्यांनी मुक्काम केला त्या घरातील भगिनींनी आत्महत्या केली नसेल, परंतु विदर्भातील एका भगिनीने आत्महत्या केली. याचा अर्थ राज्याच्या मुख्यमंत्र्यांची क्रेडिटीबिलिटी आज पणाला लागली आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांची व्यक्तिगत क्रेडिबिलिटी असेल, परंतु राज्याच्या मुख्यमंत्र्यांची क्रेडिबिलिटीची आवश्यकता आहे. राज्याचे मुख्यमंत्री एखाद्या ठिकाणी मुक्काम करुन सांत्वन करीत असतील तर त्यामुळे इतरांना आत्मविश्वास वाटला पाहिजे की, राज्य सरकार आमच्या मागे ठामपणे उभे आहे. सरकारकडून विसंगत वक्तव्ये केली जात आहेत. माननीय मुख्यमंत्र्यांनी दोन दिवसापूर्वी पत्रकार परिषद घेऊन सांगितले की, शेतकऱ्यांना कर्जमाफी देता येणार नाही. त्या संदर्भात सुध्दा वेगवेगळी वक्तव्ये करण्यात आली. या सभागृहामध्ये सभागृह नेत्यांनी जे वक्तव्य केले ते सभागृहाच्या रेकॉर्डवर आहे. त्यांनी सांगितले की, आम्हाला कर्जमाफी देता येणार नाही. राज्यावर 3.5 लाख कोटी रुपयांचे कर्ज आहे.

मी माननीय परिवहन मंत्री श्री.दिवाकर रावते व माननीय जलसंपदा राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे यांना माहितीसाठी सांगू इच्छितो की, काल नाशिक येथे श्री.उध्दव ठाकरे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली पाहिजे. आज तुम्ही सत्तेवर आहात. सत्तेवर असताना सरकारमधील एका घटक पक्षाच्या प्रमुखांनी जे वक्तव्य केले त्याबाबत सरकारमध्ये राहून त्यांची भूमिका काय आहे हे चर्चेपूर्वी सभागृहात स्पष्ट झाले पाहिजे, चर्चेनंतर नाही. सरकारने शेतक-यांची कर्जमाफी करणार ही घोषणा करावी आणि नंतर या प्रश्नाबाबत चर्चा करावी. या ठाम भूमिकेसाठी राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांची क्रेडिबिलिटी महत्वाची आहे. राज्याचे माननीय

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे....

मुख्यमंत्री ज्यावेळी शेतकऱ्यांच्या घरामध्ये जातात, त्यांचे अश्रू पुसण्याचा प्रयत्न करतात, आत्महत्या करु नका, राज्य सरकार तुमच्या मागे उभे आहे हे सांगण्याचा प्रयत्न करतात, त्याच ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. याचा अर्थ माननीय मुख्यमंत्र्यांवरचा लोकांचा विश्वास उडाल्याचे द्योतक पहावयास मिळत आहे. या संदर्भात सरकारची भूमिका स्पष्ट होणे आवश्यक आहे. चर्चा नंतर करता येईल. कर्जमाफीचा फायदा कोणाला किती झाला याच्या मेरिटवर चर्चा करण्याची आमची तयारी आहे. जोपर्यंत सरकार शेतकऱ्यांची कर्जमाफी जाहीर करणार नाही तोपर्यंत या सदनाचे कामकाज होऊ नये अशी आमची ठामपणाची भूमिका आहे. म्हणून सरकारच्या वतीने भूमिका स्पष्ट करावी आणि त्यानंतरच कामकाजाला सुरुवात करावी अशी आमची मागणी आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी सरकारने शेतकऱ्यांच्या कर्जमाफी जाहीर करावी या दृष्टीने नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे व त्याबाबत त्यांचे म्हणणे मांडले आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात मागील दोन दिवस आम्ही सभागृहात आग्रहाची मागणी करीत आहोत. सरकारला या विषयाबाबत काहीच सहानुभूती नाही, संवेदना नाही.

सभापती महोदय, आज गिरणी कामगारांचा प्रचंड मोर्चा मुंबई शहरामध्ये निघालेला आहे. विधानसभा सभागृहामध्ये या विषयाबाबत संसदीय कामकाज मंत्र्यांनी केलेले भाष्य मी ऐकले आहे. त्यांनी असे म्हटले की, आम्ही त्यांच्याशी चर्चा करणार आहोत, आम्ही त्यांच्याशी बोलणी करणार आहोत, आमची चर्चा होणार आहे. काल भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांनी सांगितले की, अच्छे दिन आने के लिए 5 साल नहीं 25 साल लगेंगे. तुम्ही शेतकऱ्यांना कधी न्याय देणार आहात? नियम 289 अन्वये प्रस्तावाच्या सूचनेच्या अनुषंगाने आजचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेवून ताबडतोब शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या संदर्भात आणि गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत शासनाने घोषणा करावी, त्यानंतरच सभागृहाचे कामकाज सुरु करावे अशी मी आपल्याला विनंती करतो.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मागणी केली की, सरकारचे

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी सभागृहात घोषणा देत असतात)

या ठिकाणी........(गोंधळ)......यांना गोंधळ करायचा आहे का? ऐकून घ्यायचे नाही का? आम्ही त्यांचे म्हणणे शांततेने ऐकले....(गोंधळ).....निव्वळ तुम्ही त्यांचे अध्यक्ष आहात म्हणून असे चालले आहे का?....(गोंधळ) सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण द्यावे....(अडथळा)...यांनी सगळा भ्रष्टाचार करायचा, यांनी सगळे महामंडळ लुटायचे, विविध महामंडळांवर 45 हजार कोटी रुपयांचे कर्ज करुन 5 हजार कोटी रुपयांचे व्याज भरायला लावायचे आणि परत कर्जमुक्ती करा सांगायचे. सौ-सौ चूहे खाकर बिल्ली हज को चली.

(विरोधी पक्षाचे अनेक माननीय सदस्य एकाच वेळी सभागृहात घोषणा देत असतात)

**सभापती** : सभागृहाची बैठक दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 12.09 ते 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)**

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य हौदेमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक 15 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.00 ते 1.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

.........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती प्रा.जनार्दन चांदूरकर)**

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य वेलमध्ये येऊन एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती :** सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.15 ते 1.25 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--------

यानंतर श्री. अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

( विरोधी पक्षातील सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

**उप सभापती** : सभागृहातील गोंधळसदृश परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज पार पाडणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार, दिनांक 16 जुलै, 2015 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक दुपारी 1 वाजून 27 मिनिटांनी गुरुवार, दिनांक 16 जुलै, 2015 रोजीच्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION